अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 18 सप्टेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 05 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# होमिओपॅथी डॉक्टरांची मेडिकल कॉन्सिलमध्ये नोंदणी
## आयएमएचा तीव्र विरोध, आज ब्रम्हपुरीत २४ तास ओपीडी बंद

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासनाने ०५ सप्टेंबर २०२५ पासून लागू होत असलेल्या नव्या शासन निर्णयानुसार, ज्या बी.एच.एम.एस (होमिओपॅथी) डॉक्टरांनी सीसीएमपी नावाचा एक वर्षाचा ब्रिज कोर्स पूर्ण केला आहे, अशा डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये केली जाणार आहे.

या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याने जोरदार आवाज उठवला आहे. हा निर्णय सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करणारा, अन्यायकारक व अत्यंत धोकादायक असल्याचे आयएमएचे म्हणणे आहे.

### न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना शासनाचा आदेश?

फेब्रुवारी २०२५ मध्ये आयएमए ने याच निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून अंतिम निर्णय अद्याप आलेला नाही. तरीही ०५ सप्टेंबर २०२५ला शासन निर्णय काढून लागू करण्याचा शासनाचा निर्णय संभाव्य न्यायालयीन प्रक्रियेचा व न्यायालयाचा अवमान ठरतो, असे आयएमए चे म्हणणे आहे.

### सीसीएमपी कोर्स म्हणजे नेमकं काय?

बी.एच.एम.एस डॉक्टरांसाठी तयार करण्यात आलेला सीसीएमपी कोर्स हा केवळ १ वर्षाचा ब्रिज कोर्स आहे, ज्यामध्ये फार्माकॉलॉजी आणि मेडिसिनसारख्या विषयांचे फक्त प्राथमिक शिक्षण दिले जाते. इंडियन मेडिकल असोशिएशनच्या मते, हा कोर्स एम.बी.बी.एस. च्या ५.५ वर्षांच्या सखोल अभ्यासक्रमाच्या तोडीचा अजिबात नाही.

### संभाव्य धोके काय?

इंडियन मेडिकल असोसिएशन नुसार, जर या कोर्सधारकांना मॉडर्न मेडिसिन प्रॅक्टिशनर मान्यता दिली गेली, तर सामान्य रुग्ण भ्रमित होतील. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, योग्य निदान, औषधांचे अचूक प्रमाण, सर्जरीसंबंधी ज्ञान या सर्व बाबतीत अपुरे शिक्षण असलेल्या डॉक्टरांकडून उपचार केल्यास रुग्णाच्या जीवाला धोका होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर एम.बी.बी.एस. डॉक्टरांच्या सायंटिफिक प्रतिमेलाही धक्का बसू शकतो, असा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशनने दिला आहे.

### ब्रह्मपुरीत २४ तास ओपीडी सेवा बंद :

आयएमए ब्रह्मपुरी शाखेच्या वतीने १८ सप्टेंबर सकाळपासून ते १९सप्टेंबर पर्यंत सर्व ओपीडी सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही माहिती ब्रह्मपुरी येथील आयएमए हॉलमध्ये

(उर्वरित पान क्र. ५ वर)

# एकाच धर्माचे शिक्षण संविधान मूल्यांना छेद देणारे - पद्मश्री डॉ. थोरात

ब्रह्मपुरी/का.प्र.

'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे मुळापासून समजून घेतले तर सार्वत्रिक शिक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने समाजाच्या व्यापक हिताचे असावे पण या धोरणात ते दिसत नाही. भारतीय ज्ञानपरंपरेच्या नावाने केवळ एका धर्माचे शिक्षण देणे हे संविधान विरोधी आहे. सर्वच धर्माचा अभ्यास हे संविधानाच्या मूल्यांना धरून होईल. अमेरिकेतील शिक्षण धोरण डोळ्यासमोर ठेवून भारतात असे धोरण राबविताना या देशातील वंचित घटकांचा विचार करण्यात आलेला नाही. नव्या शैक्षणिक धोरणात गळतीला चालना मिळणे हे वंचित घटकांना शिक्षणापासून




दूर ठेवण्याचे षडयंत्र आहे. खाजगी विद्यापीठांना व परदेशी विद्यापीठांना निमंत्रण देऊन श्रीमंत लोकांसाठीच शिक्षण उपलब्ध करून देणे आणि गरिबांना शिक्षण व्यवस्थेतून हद्दपार करणे हाच हेतू दिसून येतो. म्हणून सुजान प्राध्यापकांनी भूमिका घेऊन लोकशाही मार्गाने लढा उभा केला पाहिजे. वंचित घटकांच्या शिक्षणासाठी भूमिका घेतली पाहिजे.' असे प्रतिपादन रविवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : आव्हाने आणि जबाबदारी ' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात पद्मश्री डॉ. थोरात यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील आव्हाने विशद करताना केले.

प्रोग्रेसिव्ह टीचर्स फोरम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या सत्रात शिक्षण विषयाचे अभ्यासक प्रशिक्षण चळवळीतील अग्रणी प्रा. रमेश बीजेकर यांनी शिक्षणामागील मूलगामी विचार आपल्या मांडणीत केला. संविधान मूल्यांना छेद देण्यासाठी, बहुसंख्य वंचित घटकातील लोकांच्या हक्काचे सार्वत्रिक शिक्षणाचे दरवाजे बंद करण्यासाठी शिस्तबद्ध पद्धतीने नवीन शैक्षणिक धोरण राबविले जात आहे. यासंदर्भात आता भूमिका घेण्याची गरज निश्चितपणे आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

महाविद्यालय पातळीवर नवीन शैक्षणिक धोरण राबवताना काय अडचणी येत आहेत, विद्यापीठाकडून आणि प्रशासनाकडून त्या कशा सोडवल्या जात नाही. याची काय कारणे आहेत यासंदर्भात विस्तृत चर्चा मुक्त संवाद आणि प्रश्नोत्तर या सत्रामध्ये झाली. यावेळी गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर आणि यवतमाळ अशा विदर्भातील विविध जिल्ह्यातून बहुसंख्य प्राध्यापक प्रस्तुत राष्ट्रीय चर्चासत्रासाठी उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष डॉ देवेश कांबळे यांनी प्रत्यक्ष शिक्षण प्रक्रियेतील विविध अडचणी, अभ्यासक्रम आणि परीक्षा तसेच शिष्यवृत्ती यासंदर्भात काय वस्तुस्थिती आहे हे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष सुरडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धर्मानंद फुलझेले यांनी केले. आभार डॉ. अनमोल शेंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रोग्रेसिव्ह टीचर्स फोरमचे सदस्य तसेच आंबेडकर महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## संपादकीय...

# कसरतीची चौथी फेरी

उरलेसुरले वस्त्रहरण रोखण्यासाठी उबाठा गटाच्या चाललेल्या कसरतींमधला आणखी एक अंक गुरुवारी पार पडला. दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर ही कसरतीची चौथी फेरी आहे, असं सांगितलं गेलं. राजकीय पक्ष एकत्र येतात. विलगही होतात. पण, त्याला जनतेच्या आस्थेचं, भल्याचं काही कारण असतं. यांच्या एकत्र येण्यात तसं काही दिसत नाही. भरपूर मार खाल्लेल्या, सगळीकडून हरून आलेल्या, थकलेल्या पैलवानांनी नंतर संयुक्तपणे खेळण्याचा विचार करण्यासारखं काहीतरी चाललं आहे. एकतर कुस्ती अशी युती करून खेळता येत नाही. त्यासाठी स्वत:तच दम, स्वत:ची मेहनत असावी लागते. गंमत म्हणजे, या दोघांनीही आतापर्यंत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा सांगत जनतेचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या स्वर्गीय नेत्याबाबत असलेल्या प्रेमापोटी त्यांना पाठिंबाही देतात. पण, जेव्हा त्यांना वारसदारांच्या राजकारणात, कार्यपद्धतीत आपल्या प्राणप्रिय नेत्याच्या खुणा औषधालाही दिसत नाहीत, तेव्हा ते त्यांच्यापासून दूर होतात. स्वर्गीय नेत्याच्या धाटणीचा नवा नेता, नवं राजकारण शोधतात.

उबाठा गट आणि मनसे या दोन्हींबाबत नेमकं हेच झालं आहे. शिवसैनिकांनी त्यांना पाठिंबा दिला नाही असं नाही. भरभरून पाठिंबा दिला. आशेने त्यांच्याकडून शिवसेनाप्रमुखांच्या जाज्वल्य राजकारणाची वाटही पाहिली. पण, जेव्हा त्यांनी आपल्याच मिजाशीत शिवसैनिकांना साधी ओळख देणंही टाळायला सुरुवात केली, निष्ठावंतांच्या टिंगलटवाळ्या सुरू केल्या, तेव्हा शिवसैनिक दुखावला. तो क्रमाक्रमाने त्यांच्यापासून दूर गेला. दोन्ही बंधूंच्या भाषा आणि केवळ आपल्या राजकारणाच्या संकुचित सोयी बघण्याच्या पावित्र्याने आज आहे, तोही उद्या असेल की नाही याविषयी शंकाच आहे. भाजपच्या पाठीत खंजीर खुपसून त्यांचा विश्वासघात केल्यानंतर उबाठाने केवळ सत्तेसाठी काँग्रेसच्या गोटात शिरकाव केला. मनसेने असा अधिकृत घरोबा केला नसला, तरी आपल्या राजकीय भूमिका दर निवडणुकीला आणि दोन निवडणुकांच्या मधल्या काळात बदलण्याचा रेकॉर्ड केला आहे. मनसैनिकांनाही त्याबाबत कोडंच आहे. तेही नेहमी गोंधळलेलेच असतात. माजी गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर हे राज ठाकरे यांचे एकनिष्ठ एकलव्य. पण, त्यांचीही त्यामुळे माध्यमांसमोर बोलताना नेहमी गोची होते. ते कोणत्याच गोष्टीशी निश्चित हमी देऊ शकत नाहीत. 'आमचे पक्षप्रमुखच त्याबाबत निर्णय घेतील' असं सांगून ते स्वत:ची सुटका करून घेत असतात.

या युतीसाठी उबाठाचा विशेष आग्रह असून ते युती घडवून आणण्यासाठी कोणत्याही गोष्टीला तयार होतील' असंही नांदगावकर माध्यमांसमोर बोलले आहेत. म्हणजे, खरी भीती कोणाला आहे आणि आपलं वस्त्रहरण रोखण्यासाठी दोघांपैकी कोणाची जास्त घाई आहे हे नांदगावकर यांनीच उघड केलं, हे बरं झालं. या दोघांनाही मुंबई, नाशिक, ठाणे, आणि पुणे या चार मोठ्या शहरांतच रस आहे. बाकी ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांनी निर्णय करावा अशी भूमिका असल्याचंही नांदगावकर यांनी सांगितलं. मनसेसाठी उबाठा महाविकास आघाडीची साथ सोडणार का? हा प्रश्नही असाच खोल आहे. कारण यांच्या भेटीसाठी जशा वाढल्या, तशी काँग्रेसच्या नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच उबाठाची भेट घेतली. मनसेला सोबत घेणं काँग्रेससाठी अडचणीचंच ठरणार आहे. 'मविआची आणि आमची विचारसरणी वेगळी आहे', हेही नांदगावकर यांनी स्पष्ट केलं आहे. मविआ सोडायला उबाठाची हरकत नाही. फक्त ते समजून उमजून करावं आणि राष्ट्रवादी (शप) गटाला बरोबर ठेवावं, असा त्यांचा विचार आहे. तो मनसेसाठी अवघड आहे. आघाडीचा तिढा आणि मग जागावाटपाचा गुंता वाटतो तितका सोपा नाही. त्याची जाण सामान्य कार्यकर्त्यांना आहे. त्यामुळेच अगदी मोजकेच बोलताहेत, बाकी सारे शांत आहेत. जे उत्साह दाखवताहेत, त्यांचा भ्रमनिरास अटळ आहे !!

# किक बॉक्सिंग स्पर्धेत ने.हि. विद्यालयाचे सुयश




ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रिडा परिषद चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत नेवजाबाई हितकारिणी विद्यालय येथील दर्शन सुरेश काळबांडे वर्ग ७ अ याने २७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून गोंदिया येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याचे मान मिळविले.

त्याच्या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, विद्यालयाचे मुख्याध्यापक के. एम. नाईक, उपमुख्याध्यापक ए.डब्ल्यू. नाकाडे, पर्यवेक्षक पी.आर. जिभकाटे, तथा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# भीषण अपघातात मोटार सायकलस्वार तरूणाचा मृत्यू

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील आरमोरी रोडवरील प्रज्वल बारसमोर शनिवारी (दि. १३ सप्टेंबर) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात मागली येथील अजय आनंदराव कार (वय २४) या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजय कार हा ब्रम्हपुरीतील प्रशांत पिलारे यांच्या चारचाकी वाहनावर चालक म्हणून कार्यरत होता. नेहमीप्रमाणे तो शनिवारी सकाळी घारून [illegible] मोटारसायकलने ब्रम्हपुरीत आला होता. संध्याकाळी साडेसहा वाजता तो मागलीकडे परतत असताना समोरून येणाऱ्या मिनी पिकअप (क्रमांक MH-३४ BZ-३१५३) ने भरधाव वेगात व निष्काळजीपणे त्याच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत अजय कार गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित रोशन राऊत यांनी तातडीने ॲम्ब्युलन्स बोलावून त्याला ग्रामीण रुग्णालय, ब्रम्हपुरी येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

मृत अजय कार हा आनंदराव तुकाराम कार यांचा मुलगा असून, त्याच्या निधनाने मागली गावात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी ब्रम्हपुरी पोलिसांनी संबंधित मिनी पिकअप चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१ तसेच मोटार वाहन कायदा १९८९ अंतर्गत कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ पॉलिटेक्रिक बेटाळा येथे अभियंता दिन साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, बेटाळा येथे भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रा. सुयोग बाळबुधे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व इन्फोसॉफ्ट येथे वरिष्ठ UI/UX विश्लेषक म्हणून कार्यरत असलेले गणेश बोरकुटे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अभियंता दिनाच्या निमित्ताने नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्रे, वादविवाद स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, स्पोर्ट्स इव्हेंट्स आणि इतर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच नेतृत्व, संवाद कौशल्य आणि टीमवर्क याबाबत प्रशिक्षण मिळाले.

## विनोदिनी

एक सासू किराणा दुकानात सामान घ्यायला आली.. तिने दुकानदाराला एक किलो डाळ, एक किलो वाटाणे आणि एक किलो मुग सगळं एकत्र एकाच पिशवीत घालून दयायला सांगितले...

दुकानदार : सगळं मिक्स पण कशाला..??

सासूबाई :-घरात तीन तीन सुना रिकाम्या आहेत करतील त्या वेगळं वेगळं... अन् दोन किलो तांदूळ ते पण त्यातच घाल.

दुकानदार : काकू, तांदूळ पण कशाला

सासूबाई : काय करणार तिन्ही सुना दिवसभर मोबाईल मध्ये घुसून बसलेल्या असतात त्यांना काहीतरी कामं लावायला पाहिजेत...

दुकानदाराने सगळं एका पिशवीत घालून, चारशे रुपये झाले द्या म्हणाला...

सासूबाई : पैसे नाहीत माझ्या कडे आता उधारी दे...

दुकानदार : काकू मी उधारी देतं नाही...

सासूबाई : उधारी देतं नाहीस तर ठेव सामान तुझ्याकडे...

दुकानदार : नको नको काकू... घेऊन जा.. आमच्याकडे कुठे तीन सुना आहेत ते सगळं वेगळं करायला..!!!

# शासनाच्या सेवा पंधरवाडा योजनेअंतर्गत पांदन रस्त्यांच्या सर्वेक्षणास सुरुवात

## ‘गाव तेथे श्मशानभूमी मोहीम राबविण्यात येणार



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार ब्रम्हपुरी तालुक्यात ‘सेवा पंधरवाडा’ उपक्रमांतर्गत महत्त्वाकांक्षी पांदन रस्ता सर्वेक्षण व ‘गाव तेथे स्मशानभूमी’ ही मोहीम दिनांक १० सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत तालुक्यातील ६ मंडळांतील एकूण ४१७ पांदन रस्त्यांचे सर्वेक्षण करून, रस्त्यांचे मोजमाप, सिमांकन, अतिक्रमण हटविणे व विशिष्ट क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. हे रस्ते शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांच्या दैनंदिन वापरासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्यामुळे शेतीमध्ये जाण्या-येण्यासाठी व यंत्रसामग्री वापरासाठी मोठी मदत होणार आहे.

शासन निर्णय क्रमांक लवेसु-१०१५/प्र.क्र. ४५८/ भूमापन (ल-१) दिनांक २९ऑगस्ट २०२५ अन्वये ही कार्यवाही केली जात असून, या अंतर्गत पायमार्ग, गाडीमार्ग, शेत पांदन रस्ते इत्यादींचे अभिलेख अद्ययावत करून त्यांना भूमी अभिलेख विभागामार्फत अधिकृत नोंद दिली जाईल. यामुळे अनधिकृत अतिक्रमणावर आळा बसेल व रस्ते जनतेच्या वापरासाठी कायमस्वरूपी खुले राहतील.

गाव तेथे स्मशानभूमी या मोहिमेंतर्गत तालुक्यातील प्रत्येक गावात स्मशानभूमीची उपलब्धता सुनिश्चित केली जाणार आहे. यासाठी १७ सप्टेंबर २०२५ रोजी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये एकाच दिवशी ग्रामसभा घेण्यात येणार आहे. या ग्रामसभांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल या उपक्रमामुळे ग्रामविकासाला चालना मिळणार असून, शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होणार आहेत. प्रशासनाने नागरिकांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

# एलएमबी स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ॲक्टिव्हिटीतून साकारल्या आकर्षक गणेश प्रतिमा







ब्रम्हपुरी/का.प्र.

संपूर्ण भारतात उत्साहात व भक्ती भावाने साजरा होणारा उत्सव म्हणजे गणेश उत्सव. याच गणेशात्सवाचे औचित्य साधून एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या प्रि-स्कूल विभागातील चिमुकल्यांनी २५ ऑगष्ट २०२५ला ॲक्टिविटी डे च्या माध्यमातून अभूतपुर्व अशा गणेश मूर्तीच्या प्रतिमा बनविण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दरवर्षीच मिळतो. यात प्रि-स्कूलच्या विद्यार्थ्यांचा उत्साह देखील वाखणण्यासारखा होता.

मुलांमधील सुप्त गुणांचा विकास व्हावा यासाठी या एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे नेहमी खूप मोठे योगदान असते. त्यातीलच गणेश मेकींग ॲक्टिविटी हे मुलांमधील फाईन मोटर स्कील्स विकसित व्हावे यासाठी ही ॲक्टिविटी घेण्यात आली. यावेळी मुलांनी रंगबिरंगी ‘क्ले’द्वारे गणपतीची मूर्ती तयार केली. यावेळी प्रि-स्कुलच्या सर्व शिक्षकांनी मुलांना विविधरूपी गणेश मुर्ती बनविण्यासाठी मदत केली. तसेच गणपती उत्सव त्यासंबंधीत या देवतेचे महत्व व त्यासंदर्भात त्यांच्या वेगवेगळ्या कथा व माहिती मूलांना सांगण्यात आली. विद्यार्थ्यांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जल्लोष करत तयार केलेल्या प्रतिमा आपल्या घरी नेल्या.

संपूर्ण भारतात गणेश चतुर्थी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. प्रकृती व प्रेम संस्कृती विषयी विद्यार्थ्यांकरीता अशाप्रकारच्या उपक्रमांचे आयोजन स्कूल मध्ये करीत असतात. अशा प्रकारे गणेश मेकींग ॲक्टविटी चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहात सादर केली.

●●●●●●●

# सामाजिक दायित्व समजून रस्त्यावरील खड्डे बुजविले

## नवेगाव-बोरगांव मार्ग, प्रेमलाल धोटे यांचा पुढाकार



ब्रम्हपुरी/का.प्र.

नवेगाव ते बोरगाव येथील मुख्य रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून खड्डेमय झाल्यामुळे नागरिक, वाहनचालक व पादचारी यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. याकडे ग्रामपंचायत व तालुका प्रशासनाने लक्ष दिले नाही. परिणामी या मार्गावर जागोजागी खड्डे पडले होते. अखेर सामाजिक कार्यकर्ते प्रेमलाल धोटे यांनी पुढाकार घेत स्वखर्चाने रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता सुरक्षित केला.

वडसा -ब्रम्हपुरी राष्ट्रीय महामार्ग डी ३५३ मार्गावरील पुलीयाचे काम संथगतीने सुरू असल्याने पावसाळ्यात अनेकदा हा मार्ग पुर्णपणे बंद होत असल्याने पर्यायी रस्ता व्यवस्था म्हणून दुचाकीस्वार व चारचाकी वाहनधारक नवेगाव ते बोरगाव या मुख्य रस्त्याने मार्गक्रमण करीत होते. परिणामी, या मार्गावर जागोजागी खड्डे निर्माण झाले होते. ब्रम्हपुरी आरोग्य नगरी म्हणून ओळखले जाते आणि अनेक रुग्ण आपल्या उपचारासाठी येत असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणावर मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहन चालवताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. सामाजिक दायित्व समजून नवेगाव ते बोरगाव रोड वर खडी, मुरूम व दगड यांची व्यवस्था करण्यात आली. प्रेमलाल धोटे यांनी स्वखर्चातून खड्डे बुजविले. या कार्यात त्यांना राष्ट्रपाल बुराडे, सिध्दार्थ दमके, हिरालाल धोटे यांनी मोलाची साथ दिली.

# महर्षी व्यास पत संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील महर्षी व्यास नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ब्रम्हपुरी र.न.१०२७/२२ या संस्थेची ४ थी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १४ सप्टेंबर २०२५ ला रोज रविवारला चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा ब्रम्हपुरीचे कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थचे अध्यक्ष प्रभुजी जेठिराम वाघधरे हे होते. सर्वप्रथम संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने महर्षी व्यास व महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलित करून करण्यात आले. यानंतर संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाचे उपस्थित सभासदाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.त्यानंतर या कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सभासद यशवंत दिघोरे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान संचालक यांची उपस्थिती होती संस्थेच्या वतीने त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

पतसंस्थचे संचालक मा.श्री. रविंद्रजी अलगदेवे सर यांनी प्रास्ताविक सादर केले यामध्ये पतसंस्थेच्या निर्मिती पासुन ते आजपर्यंत चा प्रगतीचा आढावा सांगितला. प्रास्तविक भाषणानंतर पतसंस्थेचे व्यवस्थापक संदिप भानारकर यांनी सभेला सुरुवात केली. यामध्ये सन २०२४- २५ या आर्थिक वर्षाच्या अहवाल वाचन करण्यात आले यानंतर नफा-तोटा,ताळेबंद पत्रक लेखा परीक्षण अहवाल सभागृहात वाचन करण्यात आले.व यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी पथसंस्थचे सभेकरीता बहुसंख्येने सभासद बंधू आणि भगिनींचे उपस्थितीत होते.

सभेचे संचालन श्री संदीप भानारकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संचालक आनंद शिवरकर सर यांनी केले. यावेळी पतसंस्थेचे संचालक अनिल पचारे, नत्थुजी चांदेकर, प्रमोद दिघोरे, रवींद्र अलगदेवे, युवराज इडपाते, स्वप्नील अलगदेवे, संचालिका ग्रीष्मा दिघोरे, वैशाली चाचीरे, व संस्थेचे व्यवस्थापक संदिप भानारकर, मुकेश भानारकर, करिष्मा डहारे तथा दैनिक अभिकर्ता व सभासद यांची उपस्थित होती.

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत ब्रम्हपुरीच्या जलतरणपटूंकडून पदकांची लयलूट

## दोन गोल्ड, तीन सिल्व्हर व तीन ब्रॉन्झ पदक






ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र स्टेट वेटरंस एक्वॅटिक असोसिएशन आणि मास्टर्स एक्वॅटिक असोसिएशन छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ वी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा २०२५ चे आयोजन दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०२५ ला सिद्धार्थ जलतरण तलाव छत्रपती संभाजी नगर येथे करण्यात आले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातून विविध जिल्ह्यांतील एकूण ३५० जलतरणपटू सहभागी झाले होते. चंद्रपूर जिल्ह्यातून ब्रह्मपुरी येथील शिवराज मालवी, प्रशांत मत्ते, स्पार्टाकस शेंडे, प्रीतम राऊत, पराग राऊत, सतीश मेश्राम यांनी चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत सहभाग घेतला व राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण आठ पदकांची लूट करीत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ब्रह्मपुरीचे नाव रोशन केले.

या स्पर्धेत शिवराज मालवी यांनी ६० ते ६४ वयोगटात ५० मी. फ्रिस्टाईल मध्ये गोल्ड मेडल, १०० मी. फ्रिस्टाईल मध्ये सिल्व्हर मेडल, २०० मी. फ्रिस्टाईल मध्ये ब्रॉंझ मेडल तर १०० मी. बॅकस्ट्रोक मध्ये ब्रॉंझ मेडल असे एकुण चार मेडल्स प्राप्त केले. स्पार्टाकस शेंडे यांनी ४० ते ४४ या वयोगटात ५० मी. बटरफ्लाय मध्ये ब्रॉंझ मेडल, २५ ते २९ या वयोगटात प्रितम राऊत यांनी ५० मी. बॅकस्ट्रोक मध्ये सिल्व्हर मेडल, ३० ते ३४ वयोगटात पराग राऊत यांनी ५० मी. बटरफ्लाय मध्ये गोल्ड मेडल, ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सिल्व्हर मेडल प्राप्त केले. अशाप्रकारे ब्रह्मपुरीच्या जलतरण पटुंनी एकुण ८ मेडल्स प्राप्त करीत नेत्रदीपक यश संपादन करून ब्रह्मपुरी चे नाव रोशन केले. त्याबद्दल समाजातील सर्व स्तरातून व मित्रमंडळींनी जलतरण पटुंचे अभिनंदन केले आहे तसेच पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# गोवर्धन टिकले आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ब्रह्मपुरी पंचायत समिती मधील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जुगनाळा येथे सहाय्यक शिक्षक पदावर कार्यरत असणारे गोवर्धन टिकले यांना यावर्षीचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने चंद्रपूर येथील प्रियदर्शनी सभागृहात शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार, राजुरा आमदार देवराव भोंगळे यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी पुलकित सिंग यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी अतिरिक्त मु.का. अधिकारी घायगुडे साहेब, उपमुख्य कार्यपालन अधिकारी साळुंखे साहेब, शिक्षणाधिकारी अश्विनी केळकर मॅडम, माध्यमिक शिक्षणाधिकारी राजू पातळे, तसेच सर्व पंचायत समिती गटविकास अधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सांस्कृतिक व क्रीडा विषयी स्पर्धा, परसबाग निर्मिती, व्यसनमुक्त शाळा यासारख्या विविध उपक्रमांचे आयोजन, विविध प्रशिक्षणात मार्गदर्शक, शाळा विकासासाठी सतत झटणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ब्रह्मपुरी पंचायत समिती चे गटविकास अधिकारी मा.रवींद्र घुबडे, गटशिक्षणाधिकारी मानिक खुणे, विस्तार अधिकारी गायत्री तोराम व विद्या शेळके मॅडम, केंद्रप्रमुख सुरेश बुराडे, शाळेचे मुख्याध्यापक गजानन प्रधान, सहाय्यक शिक्षक प्रभा गणवीर, संगीता वैद्य, स्वाती लाडेकर, स्वाती नाकाडे, विषय शिक्षक धनपाल दमके, योगराज बोरकुटे तसेच जुगनाळा येथील सरपंच लक्ष्मीताई सहारे, उपसरपंच गोपाल ठाकरे , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोपाल तोंडरे, उपाध्यक्ष निर्मला देवतळे, सर्व ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, केंद्रातील सर्व शिक्षकांनी व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# किक बॉक्सिंग स्पर्धेत ट्विंकल स्कुलचे विद्यार्थी विभागस्तरावर



नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्रिडा क्षेत्रात आपली दमदार छाप सोडली आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा स्तरीय आंतरशालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत शाळेच्या तीन विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावून विभागीय स्तरावर आपली निवड निश्चित केली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन चंद्रपूर-ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ट्विंकल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वयोगट १४ मध्ये रणवीर घुबडे याने प्रथम क्रमांक मिळवला. तर वयोगट १७ मध्ये सोहम जांभुळे व रेणुका चौके यांनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. या तिन्ही विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झाली असून त्यांच्या यशाबद्दल शाळा परिवारात आनंदाचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, सचिव अजय काबरा, प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी सदर यशाचे श्रेय शाळेला व क्रिडा शिक्षक गणेश लांजेवार, महेश जिभकाटे, रूपा ताडूरवार यांना दिले.

# क्रिडा स्पर्धेत लोकमान्य टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुका क्रीडा मैदानी स्पर्धेत लोकमान्य टिळक




विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.

यात ४०० मी रनिंग स्पर्धेत १७ वर्ष वयोगटामध्ये नकुल गणेश चिंचूलकर तसेच तन्मय कवडू पिंपळकर या विद्यार्थ्यांनी तालुक्यात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला तसेच हितेश प्रशांत मेश्राम या विद्यार्थ्याने ११० मी हर्डल स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच ४०० मीटर हर्डल स्पर्धेत नकुल गणेश चिंचुलकर या विद्यार्थ्याने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. लावण्य प्रशांत मेश्राम या विद्यार्थ्याने १०० मी रनिंग स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षे वयोगटाखाली विद्यार्थिनी समीक्षा धांडे या विद्यार्थिनींनी १०० व २०० मीटर रनिंग स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला तसेच श्रेया शशांक नानोटी या विद्यार्थीनीने ३ किलोमीटर चालणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला तसेच १९ वर्ष वयोगटातील विद्यार्थी प्रणय गणेश उपासे या विद्यार्थ्याने ८०० मी १५०० मी. रनिंग प्रथम क्रमांक पटकाविला तसेच ५००० मी. रनिंग स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला, वेदांत रवींद्र कामडी या विद्यार्थ्याने देखील १९ वर्ष वयोगटाखालील मैदानी स्पर्धेत ५००० मी. १५०० मी. क्रॉस कंट्री स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला तसेच सांघिक क्रीडा ४ बाय १०० रिले स्पर्धेत तसेच ४ बाय ४०० रिले स्पर्धेत १७ वर्ष वयोगटाखालील विद्यार्थी लावण्य प्रशांत मेश्राम ,नकुल गणेश गणेश चिंचुलकर, तन्मय कवडु पिंपळकर, चंद्रकांत दिवाकर कावळे या विद्यार्थ्यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला त्याचप्रमाणें दि १३/९/२५ शनिवार ला चंद्रपूर क्रिडा संकुल या ठिकाणी झालेल्या जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत विद्यालयातील वर्ग ६ वीची विद्यार्थिनी आरोही देवांग तसेच वर्ग १० ची विद्यार्थीनी अमृता ठाकरे व वर्ग १० चा विद्यार्थी कृष्णा भुपाल या विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर किक बॉक्सिंग स्पर्धेत प्राविण्य मिळवत त्यांची विभाग स्तरावर गोंदिया या ठिकाणी होणाऱ्या विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व शाळा परिवारातर्फे विजेत्या स्पर्धकांचे खूप खूप अभिनंदन करण्यात आले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मालता दोनाडकर यांना मानद डॉक्टरेट पदवी



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील चौगान या छोट्याशा गावातील कन्या मालता नवलाजी दोनाडकर यांचे कर्तृत्व राज्यभर गाजत असून आता त्यांची कामगिरी राष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या लिजेंडरी पीस अवॉर्ड कॉन्सिलच्या प्रतिष्ठित कार्यक्रमात मालता दोनाडकर यांना मानद डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.

मालता दोनाडकर या सध्या आवळगाव येथील शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. पशुसेवेत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना डॉक्टरेट पदवीचा सन्मान मिळाला. त्यांच्या या यशामुळे चौगान गावाबरोबरच संपूर्ण ब्रह्मपुरी तालुक्यात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

मालता दोनाडकर यांनी दीर्घकाळ नागभीड येथे पशुधन पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत त्यांच्या पशुधनासाठी सातत्याने कार्य केले. जनावरांच्या उपचारापासून ते रोगप्रतिबंधक मोहिमांपर्यंत त्यांनी नेहमी आघाडी घेतली. 'कर्तृत्वाला स्त्री-पुरुषाची सीमा नसते' हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. त्यांच्या सेवाभाव व प्रामाणिकपणामुळे त्यांना २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र शासनाने नागपूर येथे गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.

'चौगानच्या मुलीने इतकी मोठी कामगिरी साध्य केली, हे आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे,' अशा प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिल्या. आजच्या काळात ग्रामीण भागातील महिलांनी शिक्षण व कार्यक्षेत्रात झेप घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण करण्याची गरज आहे. मालता दोनाडकर यांचे कार्य व त्यांना मिळालेला डॉक्टरेट सन्मान हे त्याचे उत्तम उदाहरण ठरले आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ चौगानच नव्हे तर संपूर्ण ब्रह्मपुरी तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात मानव वन्यजीव संघर्ष शिगेला पोहोचला आहे. मानव वन्यजीव संघर्षामध्ये अनेक नागरिक गंभीर जखमी झाले, तर काहींना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे ब्रह्मपुरी तालुक्यात मानव वन्यजीव संघर्ष ही नित्याचीच बाब झाली आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील लाखापूर येथील गुराखी वाघाच्या हल्ल्यात ठार झाल्याची घटना १६ सप्टेंबर २०२५ ला दुपारी ४.३० वाजता दरम्यान घडली आहे.

प्राप्त माहितीनुसार, ब्रह्मपुरी तालुक्यातील लाखापूर येथील रहिवासी सुनिल उर्फ प्रमोद बाळकृष्ण राऊत वय ३२ वर्ष हे गुरे चराईचा काम करतात. उत्तर वनपरिक्षेत्रातील अंतर्गत उपक्षेत्र ब्रम्हपुरीतील सायगाटा बीट मधील कक्ष क्रमांक ८३२ परिसरातील लाखापूर जंगलातून गुरे चराई करून परतत असतांना, अचानक वाघाने प्रमोद राऊत त्यांच्यावर हल्ला चढविला. वाघाने केलेल्या हल्ल्यात प्रमोद राऊत हे ठार झाले. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. गावकऱ्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्याना सदर घटनेची माहिती दिली. माहिती प्राप्त होताच, वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रमोद राऊत यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथे पाठविला. उत्तर वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन नरड यांनी मृतकाच्या कुटुंबियांना तात्काळ २५ हजारांची आर्थिक मदत केली.

# झाडी नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचे विमोचन

ब्रह्मपुरी/का.प्र.

झाडीपट्टी नाट्य विकास मंडळ व्दारा वडसा येथे आयोजित ५ व्या झाडीपट्टी नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचा विमोचन सोहळा नागभिड येथील डेव्हिड सभागृहात झाडी नाट्य विकास मंडळाचे अध्यक्ष अनिरुद्ध वनकरांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच संपन्न झाला. झाडीपट्टी नाट्य संमेलनाचे बोधचिन्ह नाट्यप्रेमी किशोर उरकुंडवार यांनी काढले आहे.

यावेळी नाटयसंमेलनासाठी अध्यक्ष म्हणून निवड झालेली विनोदी नट के.आत्माराम, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. शेखर डोंगरे, अभ्यासक डॉ. धनराज खानोरकर, नाट्य अभ्यासक डॉ. राजकुमार मुसणे, कलावंत विश्वास पुडके, लोकेश कुमार, पायल कडूकर, पोर्णिमा तायडे, मनीषा देशपांडे, स्वप्निल बन्सोड हे नाट्य कलावंत व हिरा मडावी, धम्मपाल सोनटक्के आदी नाट्यप्रेमी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' अंतर्गत कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील ग्रामपंचायतींना सबळ करण्यासाठी आणि ग्रामविकासाच्या गतीला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ वर्षभर राबविण्यात येणार आहे. त्याअंतर्गत पंचायत समिती ब्रम्हपुरीच्या वतीने तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि. १६ सप्टेंबर) विठ्ठल-रुक्मिणी सभागृह, ब्रम्हपुरी येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमुरकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी सभापती रामलाल दोनाडकर होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद कृष्णा सहारे यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख अतिथी म्हणून माजी जि. प. सदस्य डॉ. राजेश कांबळे, दीपाली मेश्राम, खेमराज तिडके तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी ब्रम्हपुरी, गटविकास अधिकारी रवींद्र घुबडे, सरपंच महादेव मडावी, सरपंच राधिका बावनकुळे, माणिक खुणे, राठोड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी तालुक्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायत यांचा सन्मान करण्यात आला. यात स्मार्ट ग्राम अंतर्गत उत्कृष्ट ग्रामपंचायत : वांद्रा ग्रामपंचायत (प्रथम क्रमांक) स्वच्छ ग्राम योजना अंतर्गत सुरबोडी ग्रामपंचायत (प्रथम क्रमांक), १०० टक्के कर वसुली करणारी ग्रामपंचायत चकबोथली ग्रामपंचायत यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तथा ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसंगी माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमूरकर, खेमराज तिडके, दीपाली मेश्राम, डॉ. राजेश कांबळे, कृष्णा सहारे, रामलाल दोनाडकर यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक गटविकास अधिकारी रवींद्र घुबडे यांनी केले. संचालन विस्तार अधिकारी जयेंद्र राऊत यांनी केले. आभार निशांत मेश्राम यांनी मानले.

## ... QUOTES ...

"I am a slow walker, but I never walk backwards."

- Abraham Lincoln

# होमिओपॅथी डॉक्टरांची...

(पान क्र. ९ वरून)

झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी आयएमए ब्रह्मपुरीचे अध्यक्ष डॉ. भारत गणवीर, सचिव डॉ. सतीश दोनाडकर, डॉ. नितू गणवीर, डॉ. प्रशांत झोडे, डॉ. राजेश संग्रामे, डॉ. अमोल लिचडे, डॉ. तरल नागमोती, डॉ. राजकुमार कोकरे, डॉ. राव, डॉ. सिद्धेश्वर नारिंगे, डॉ. सावजी, डॉ. संजय कापगते डॉ. श्रीकांत गेडाम, उपस्थित होते.

### जनतेला आयएमए चे आवाहन

डॉक्टरकडे उपचार घेण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अहर्ता आणि नोंदणी क्रमांक तपासा. आपत्कालीन किंवा सर्जरीसंबंधी उपचारासाठी पात्र एमबीबीएस/एमडी/एमएस/डीएनबी डॉक्टरांकडेच जावे. आरोग्य हा तुमचा मूलभूत हक्क आहे. तो संपूर्ण प्रशिक्षित आणि पात्र डॉक्टरांकडूनच मिळवावा. अशी माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनने आयोजित पत्रपरिषदेत दिली आहे.

## चारोळी

*माझ्याकडे पाहून हसतेस तू*
*मला जिंकल्यासारखे वाटते...*
*तुझ्याकडे पाहून कुणी हसलं तर,*
*ज्युनिअरने रॅगिंग केल्यासारखे वाटते...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# अर्चना मेहेर यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

नागभीड/प्रतिनिधी

नागभिड पंचायत समितीतील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पळसगाव खुर्द येथे विषय शिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या अर्चना मरघडे मेहेर यांना यावर्षीचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने, चंद्रपूर येथील प्रियदर्शनी सभागृहात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी पुलकितसिंग यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# एलएमबी स्कुलमध्ये शैक्षणिक सहलीची सांगता

## विद्यार्थ्यांनी लूटला म्हैसूर, बंगलोर येथील प्रेक्षणिय स्थळांचा आनंद






ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये सत्र २०२५-२६ च्या शैक्षणिक सत्रामध्ये शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. आयुष्यामध्ये शिक्षणाला महत्व आहे. तसेच सहलीला सुध्दा अनन्य साधारण महत्व आहे. सहलीमध्ये विद्यार्थ्यांच्या निरिक्षण, सहकार्य, आकलन क्षमतेला चालना मिळते. सोबतच विद्यार्थ्यांचे कल्पनाविस्तारामध्ये सुध्दा वाढ होत असते. सहलीला शिक्षणाचा एक महत्वाचा भाग मानला जातो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि. २१ ऑगस्ट २०२५ ते २६ ऑगस्ट २०२५ या दरम्यान सहलीचे आयोजन वर्ग ९ व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले.

सहलीचे ठिकाण कर्नाटक राज्यातील म्हैसूर आणि बैंगलोर हे होते. दि. २२ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या दरम्यान विद्यार्थ्यांनी म्हैसूर मधील म्हैसूर पॅलेस तसेच बैंगलोर मधील आर्ट गॅलरी वृंदावन गार्डन, विश्वेश्वरैया विज्ञान केंद्र, विधान सौदा, ईस्कॉन मंदिर (हरे किष्णा मंदिर) व वंडरला ॲम्युझमेंट पार्क हे पर्यटन स्थळे बघितली. या पार्क मध्ये विद्यार्थ्यांनी सवारीचा खूप आनंद घेतला. अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी सहलीचा भरभरून आनंद लुटला.

ने.हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांच्या नेतृत्वाखाली सहलीचे नियोजन करण्यात आले. शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांच्या सहकार्याने अतिशय सुंदर असे सहलीचे आयोजन करण्यात आले. तसेच सहलीला लाभलेले शिक्षकवर्ग कर्मचारी यांनी सुध्दा आपली चांगली कामगीरी बजावली. सहलीला एकूण १११ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सहलीचे प्रतिनिधित्व रश्मी राठी मॅडम यांनी केले. सहा. शिक्षिका कुमुदिनी लभाने मॅडम, धनश्री कळंबे मॅडम, विशाल कानतोडे सर, हरीदास वाकुलकर सर, मनोज नवनागे सर व कर्मचारी मोकेश मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण सहल आनंदात पार पडली.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# शासकीय योजनेच्या लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करावे

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना तसेच केंद्र सरकारची इंदिरा गांधी विधवा निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत विशेष सहाय्य योजनेतील बीपीएल लाभार्थ्यांच्या हयात दाखल्याकरीता लाभार्थी पडताळणी ॲप विकसित केले आहे. या ॲपद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचे लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट म्हणजेच हयात प्रमाणपत्र जनरेट करावयाचे असून जनरेट केलेले प्रमाणपत्र पोर्टलवर अपडेट होणार आहे.

हे डिजिटल लाइफ सर्टिफिकेट शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी १०० टक्के माहिती भरून पूर्ण करावयाचे आहे. याबाबतची माहिती तहसिल कार्यालयातर्फे प्रसिध्दी तथा प्रेसनोटतर्फे देण्यात आली आहे. हयात प्रमाणपत्राबाबत आवश्यक कारवाई पूर्ण न करणारे लाभार्थी अनुदानापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे त्वरीत हयात प्रमाणपत्र लाभार्थी पडताळणी ॲपद्वारे जनरेट करण्याचे आवाहन तहसिलदार सतिश मासाळ यांनी केले आहे.

❁❁❁❁❁❁


- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315


# शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पुस्तकाचे विमोचन



ब्रम्हपुरी/का.प्र.

साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर तर्फे प्रकाशित शिक्षक पात्रता परीक्षा (TET) या मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय ब्रम्हपुरी येथे उत्साहात पार पडले. ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या पुस्तकाचे लेखक लक्ष्मण मेश्राम, दीपक सेमस्कर व मनोहर आंबोरकर सर असून, परीक्षार्थ्यांना अभ्यासासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

पुस्तक प्रकाशनाचा समारंभ ब्रम्हपुरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी माणिक खुणे व नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरीचे मुख्याध्यापक कपूर नाईक सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या वेळी प्रमुख पाहुण्यांनी लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शिक्षक पात्रता परीक्षा (TET) ही प्रत्येक इच्छुक शिक्षकासाठी अत्यावश्यक असून, अशा प्रकारचे दर्जेदार मार्गदर्शक पुस्तक परीक्षार्थ्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी लेखकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या पुस्तकाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व सोपी मार्गदर्शन सामग्री उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404